## महिला मानद वन्यजीव रक्षक पदाची नियुक्ती करणे बाबत

### जाहिरात

वनसंरक्षक (प्रा) छत्रपती संभाजीनगर यांचे अधिनस्त वनविभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालयामार्फत छत्रपती संभाजीनगर व जालना या जिल्ह्याकरिता वन्यजीव संरक्षणार्थ वन्यजीव (संरक्षण) अधिनियम-१९७२ मधील कलम ४(१) (बी बी) मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार शासनामार्फत वनविभाग, छत्रपती संभाजीनगर स्तरावर महिला मानद वन्यजीव रक्षक पदाची नियुक्ती करावयाची आहे. नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून उप वनसंरक्षक, वन विभाग (प्रा) छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयाच्या E-mail ID - dcftabd@yahoo.co.in वर अर्ज दिनांक २३/०६/२०२५ पुर्वी सादर करून त्याची हार्ड कॉपी त्वरित कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी.

**अर्जासह खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावी:**

१. ओळखपत्र
२. कायमचा पत्ता व त्याबाबतचा पुरावा
३. वन्यजीव संरक्षण, संवर्धन, मानव-वन्यजीव संघर्ष तसेच निसर्गात संकटग्रस्त, नामशेष होत चाललेल्या प्रजातीचे संवर्धन, संरक्षण इ. बाबत केलेल्या कामाचा तपशिल.

वरील जाहिरातीच्या अनुषंगाने याद्वारे सुचित करण्यात येते की, वनसंरक्षण व वनसंवर्धनाचे काम करणाऱ्या तसेच मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्याचे काम करणाऱ्या महिला उमेदवारांची / सेवाभावी संस्थांची वाढती संख्या लक्षात घेवून प्रत्येकाला वन्यजीव संरक्षणार्थ महिला मानद वन्यजीव रक्षक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी महिला मानद वन्यजीव रक्षक या पदाकरिता वन्यजीव संरक्षणार्थ केलेल्या कामासंबंधात स्वतंत्र प्रस्तावासह अर्ज या जाहिरातीद्वारे मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १. | उप वनसंरक्षक, वन विभाग (प्रा) छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यलयाच्या E-mail ID - dcftabd@yahoo.co.in आयडीवर अर्ज स्विकारणे | दिनांक. २३/०६/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| २. | प्राप्त अर्जांची छाननी करणे | दिनांक. २३/०६/२०२५ ते दिनांक २७/०६/२०२५ |

टिप-

1. **आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत वेळोवेळी https://mahaforest.gov.in या संकेत स्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येईल. अशा सुचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची महिला उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.**
2. **महिला उमेदवारांनी अर्ज सादर करताना ओळखपत्र व कायमचा पत्ता याबाबतचा पुरावा सोबत जोडणे बंधनकारक आहे.**

प्रस्तुत जाहिरात ही संक्षिप्त जाहिरात असुन अर्ज स्विकारण्याची पद्धत, अर्हता, निवडीची प्रक्रिया याबाबतचा सविस्तर तपशिल https://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्याचे कृपया अवलोकन करावे. उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून आवश्यक माहिती वरील संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

(श्रीमती सुवर्णा माने) भा.व.से.
उप वनसंरक्षक, वन विभाग (प्रा)
छत्रपती संभाजीनगर